जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2018

तरुण भारत

आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी डॉ. कराडे कॅनडाला रवाना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे टोरोंटो (कॅनडा) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी कॅनडाला रवाना झाले. ही परिषद १५ ते २१ जुलै या कालावधीत होणार आहे. या परिषदेत डॉ. कराडे 'अर्बन पुअर इन इंडिया: अ केस स्टडी ऑफ कोल्हापूर सिटी" आणि 'व्हायोलन्स अगेन्स्ट एल्डरली इन साऊथ एशिया: अ केस स्टडी ऑफ पुणे सिटी" या विषयांवर शोधनिबंध सादर करणार आहेत.

यापूर्वी, ऑस्ट्रिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्येही ते सहभागी झाले होते. त्यासाठीच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी नवी दिल्ली येथील 'आय.सी.एस.एस.आर."ने उचललेली होती. भारतीय सामाजिक समस्यांचा शास्त्रीय पद्धतीने वेध घेऊन त्याची मांडणी करणाऱ्या समाजशास्त्रज्ञांमध्ये डॉ. कराडे यांचा समावेश होतो. आरक्षण, धोरण आणि वास्तव, राष्ट्रवादी डॉ. आंबेडकर, जागतिकीकरण:भारतासमोरील आव्हाने, सीमांतिक समूह: स्वरुप आणि समस्या यांसारख्या मराठी ग्रंथांबरोबरच इंग्रजीमध्येही रावत प्रकाशन (नवी दिल्ली) व केंब्रिज यांच्यामार्फत प्रत्येकी दोन ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

१५ ते २१ या कालावधीत कॅनडा येथे आंतरराष्ट्रीय परिषद

डॉ. कराडे यांचे शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रकाशित झालेले आहेत. त्याचबरोबर त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग व आय.सी.एस्.एस्.आर., नवी दिल्ली या संस्थेच्या आर्थिक सहकार्याने दोन बृहत संशोधन प्रकल्पही पूर्ण केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्रातून तीन विद्यार्थ्यांची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झाली आहे. डॉ. कराडे भारतीय समाजशास्त्र संस्था, नवी दिल्ली या संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य व मराठी समाजशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष आहेत. तसेच त्यांना इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज, राष्ट्रपती निवास, शिमला या संस्थेची फेलोशिपदेखील मिळाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2018

पुण्यनगरी

कॅनडातील परिषदेसाठी डॉ. जगन कराडे रवाना

कोल्हापूर / प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठाचे समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे टोरोंटो (कॅनडा) येथे १५ ते २१ जुलै या कालावधीत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय समाजशास्त्र परिषदेसाठी रवाना झाले. यात ते 'अर्बन पुअर इन इंडिया : अ केस स्टडी ऑफ कोल्हापूर सिटी' आणि 'व्हायोलन्स अगेन्स्ट एल्डरली इन साऊथ एशिया : अ केस स्टडी ऑफ पुणे सिटी' यावर शोधनिबंध सादर करणार आहेत.

आरक्षण, धोरण आणि वास्तव, राष्ट्रवादी डॉ. आंबेडकर, जागतिकीकरण : भारतासमोरील आव्हाने, सीमांतिक समूह : स्वरूप आणि समस्या यासारख्या मराठी ग्रंथांबरोबरच इंग्रजीमध्येही रावत प्रकाशन (नवी दिल्ली) व केंब्रिज यांच्यामार्फत प्रत्येकी दोन ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्याचबरोबर त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग व आयसीएसएसआर या संस्थेच्या आर्थिक सहकार्याने दोन बृहत् संशोधन प्रकल्पही पूर्ण केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2018

पुढारी

विदेशी भाषा प्रवेश; अर्ज भरण्याची मुदत वाढवली

कोल्हापूर : प्रतिनिधी

विदेशी भाषा प्रवेशासाठी अर्ज भरण्याची मुदत वाढवण्यात आली आहे. २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज भरण्याची मुदत दि. २१ जुलैपर्यंत पर्यंत वाढवण्यात आली आहे. विदेशी भाषा विभागातर्फे एक वर्ष कालावधीचे भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात येतात. या अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रत्येकी पन्नास इतकी आहे. यासाठी १२ वी उत्तीर्ण अशी प्रवेश अर्हता आहे. दररोज सायंकाळी एक तास याप्रमाणे वर्ग असतात. अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागातर्फे करण्यात आले आहे.